अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# पोलीस आयुक्तांचे पद की प्यादे

मुंबईसारख्या महानगरीला १४ दिवस पोलीस आयुक्तच नव्हता. यापूर्वीचे आयुक्त सत्यपालसिंह यांनी राजीनामा दिल्यानंतर जास्तीत जास्त दोन ते तीन दिवसांत हे पद भरले जायला हवे होते. सत्यपालसिंह हे राजीनामा देण्याच्या तयारीत होतेच. त्यांच्या हालचाली राज्य सरकारच्या लक्षातही आल्या होत्या. त्यामुळे त्यांनी खूप तडकाफडकी राजीनामा दिला असेही नव्हते. महत्त्वाचे म्हणजे सरकारी कार्यपध्दतीत कोणतेही पद केव्हाही रिकामे होऊ शकते. विशेषत: मोठी पदे जास्त काळ रिकामी राहू देणे अयोग्य असते. पोलिस आयुक्त, पोलीस महासंचालक, मुख्य सचिव, गृहसचिव, पालिका आयुक्त, अर्थ महसूल किंवा नागरी विकास खात्यांमधल्या सचिव पदांवर नियुक्त्या करताना त्या वेळेवर झाल्या तर त्याचा प्रशासनावर परिणाम होत नाही. त्यातही सुरक्षिततेशी ज्यांचा संबंध आहे किंवा महत्त्वाच्या नागरी सुविधांची ज्यांच्याकडे जबाबदारी आहे अशी पदे दीर्घकाळ रिकामी राहू देणे धोक्याचे असते. त्याचा त्याचा कामांवर परिणाम होतो आणि त्या परिस्थितीचा नको ते लोक गैरफायदा घेतात. प्रशासनात किंवा यंत्रणेमध्ये बेदिली माजण्याची शक्यता असते. साध्या छोट्या सरकारी कार्यालयात साहेब दोन दिवस रजेवर गेले तरी तिथला कारकूनसुध्दा त्या परिस्थितीचा फायदा उठवतो. इथे जर महत्त्वाची पदे १४-१४ दिवस रिकामी राहिली तर त्याचा निश्चितच परिणाम होऊ शकतो. आज मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय दृष्ट्या महत्वाच्या आणि राज्याची राजधानी असलेल्या महानगरीला पोलीस आयुक्त नेमताना सरकारला एवढा वेळ लागला ही गोष्ट निश्चितच खटकणारी आहे. हा वेळकाढूपणा केवळ राजकीय हडेलहप्पीपणामुळे केला गेला. पोलीस आयुक्त कोणाच्या मर्जीतला आणि कोणाच्या पसंतीचा असावा यासाठी हा निर्णय लगेच होऊ शकला नाही. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री या तिघांना आपापल्या मर्जीतला अधिकारी तिथे असावा असे वाटत होते. शेवटी उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांनी पुढे केलेल्या नावाचे पारडे जड ठरले आणि मुख्यमंत्र्यांना माघार घ्यावी लागली. परंतु मुख्यमंत्र्यांनी याबाबत माघार घेतलेली नाही. उलट दिल्लीश्वरांची मर्जी सांभाळण्यात मुख्यमंत्री तेवढेच यशस्वी झाले आहेत. मारिया यांचे दिल्ली कनेक्शनही याबाबत बरेच उपयोगी पडल्याचे सांगितले जाते. म्हणूनच तीनजणांची सेवाज्येष्ठता बाजूला ठेवून राकेश मारियांचे रॉकेट यशस्वी उड्डाण करू शकले.

### मुंबईच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष

एवढ्या मोठ्या शहराच्या पोलीस आयुक्त पदावर १४ दिवस कोणीही नसावे. यावरून सरकार दरबारी मुंबईच्या सुरक्षिततेला किती गौण स्थान आहे हेही लक्षात येते. बऱ्याच वेळा पोलिसांना कायम सतर्क राहण्याचा सल्ला दिला जातो. अचानकपणे उद्भवलेल्या कोणत्याही आपत्तीला तोंड देता यावे यासाठी पोलीस व्यवस्थेकडे जय्यत तयारी असावी असेही गृहित धरले जाते. परंतु ही सगळी जय्यत तयारी ज्याच्या देखरेखीखाली किंवा, नियंत्रणाखाली होत असते ते पदच रिकामे ठेवले जात असेल किंवा त्या पदावर इतक्या तातडीने नियुक्ती व्हावी असे सरकारला वाटत नसेल. तर त्याविषयी जबाबदारी कोणाची? रिक्त पद भरण्याबाबत सरकारकडे जर कोणतीच जय्यत तयारी नसेल तर त्याचे उत्तर कोण देणार? कारण राजकारण्यांना किंवा सत्ताधाऱ्यांना सामान्य माणसाची समाजाची सुरक्षा कधीही फारशी महत्त्वाची वाटत नाही आपली सत्ता सुरक्षित राहिली पाहिजे. त्या सत्तेच्या संरक्षणासाठी सरकारमधली काही पदे ही प्याद्यांसारखी वापरली जातात. तोच प्रकार मुंबई पोलीस आयुक्तपदाबाबत झाला हे नाकारता येणार नाही. राकेश मारिया यांच्या या नियुक्तीने पुन्हा एकदा सेवाज्येष्ठतेचा मुद्दा चर्चेत आला आहे. कारण अशा सर्व पदांवर नियुक्त्या करताना कार्यक्षमतेबाबत सेवाज्येष्ठतेचाही विचार केला जातो. अलिकडे अशा ज्येष्ठ अधिकाऱ्यांचे त्यातही आयपीएस आणि आयएएस अधिकाऱ्यांचे सत्ताधाऱ्यांबरोबर कसे संबंध आहेत, यालाही बरेच महत्त्व आहे. दिल्लीत अलिकडेच सीबीआयच्या अतिरिक्त संचालक पदाच्या नियुक्तीवरून असाच वाद सुरू होता. आता मुंबई पोलीस आयुक्त पदावर सेवा ज्येष्ठतेप्रमाणे कांबळे यांची नियुक्ती व्हायला हवी होती. त्यांच्याऐवजी राकेश मारिया यांनी हे पद मिळवण्यात सरशी केली. याविरोधात कांबळे यांनी जाहीरपणे आपली नाराजी व्यक्त केली. त्यांना ठाणे आयुक्तपदाचा भार सोपवला गेला तो स्वीकारायला त्यांनी प्रारंभी नकार दिला. आता त्यांची समजूत काढण्यात आली असे वृत्त प्रसिध्द झाले आणि त्यांनी हे पद स्वीकारले. कांबळे यांची नाराजी तितकीच योग्य देखील होती. कारण सरकारी सेवेमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला आणि अधिकाऱ्याला पदोन्नती अधिक महत्त्वाची वाटत असते. अर्थात सरकारने याबाबत खुलासा करून जवळपास गेल्या साठ वर्षांत मुंबईच्या पोलीस आयुक्तपदी सेवाज्येष्ठतेपेक्षा कार्यक्षमतेला महत्त्व दिल्याचे स्पष्ट केले गेले आहे. असे असेल तर मग राकेश मारिया यांच्या नियुक्तीसाठीसुध्दा इतके दिवस लागण्याची गरज नव्हती. याचा दुसरा अर्थ असा होतो की या नियुक्तीसाठी झालेला विलंब हा सरकारकडे कार्यक्षम अधिकाऱ्यांची टंचाई असल्याचे दर्शवणारा ठरतो. अर्थात सरकारच्या या खुलाशाकडे फारसे गंभीरपणे पाहण्याची गरज नाही. अशा पदांच्या नियुक्त्या या सत्ताधाऱ्यांच्या मर्जीप्रमाणेही होत असतात हेही तितकेच खरे आहे. कारण मारिया यांच्या नियुक्तीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्या पसंतीचा आयुक्त नियुक्त केल्याच्या बातम्या प्रसिध्द झाल्या. यावरून या पदांचा आणि राजकारणाचा तितकाच गहिरा संबंध दिसतो.

### राजकीय हस्तक्षेप नसावा

यानिमित्ताने मुंबईचे पोलीस आयुक्तपद हे सुरक्षिततेच्या आणि राजकीयदृष्ट्या बरेच संवेदनशील झालेले दिसते. या सगळ्या घडामोडींचा विचार केला तर कोणताही मोठा अधिकारी आपली शासकीय सेवा पूर्ण करत असताना सेवाज्येष्ठतेचा मुद्दा पुढे करुन पदोन्नती मिळवत असतो. मात्र सत्ताधाऱ्यांनी जो पायंडा पाडला आहे तो पाहिल्यावर या सरकारी कार्यक्षमतेची व्याख्या देखील तपासावी लागेल आणि आपण त्यात कसे बसू शकतो, यासाठी पोलीस दलातील अधिकारी आतापासूनच फिल्डींग लावायला सुरुवात करतील. हा सगळा नियुक्तीचा खटाटोप संपला असला काही बदल्याही झाल्या असल्या तरी मुंबईसारख्या महानगराच्या सुरक्षिततेचे गंभीर प्रश्न सोडवायचे असतील तर राजकीय हस्तक्षेप थांबवावा लागेल. तरच इथल्या गुन्हेगारीलाही आळा बसू शकेल.